ePaper

## मुंबई-गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक बंद, सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचा निर्णय!



| वर्ष - 7 | अंक - 115 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 27 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- राहुलला राखीव ठेवायला हवे होते!
- धर्मेंद्रला पाहून हेमा मालिनी खूश
- कांद्यानंतर आता तांदळावर निर्बंध!
- महसूल मंत्र्यांना न्यायालयाने झापलं!

# एनसीपी+बीजेपी = 125+

## » अजित पवार यांचा सकारात्मक पवित्रा: पिंपरी-चिंचवड भाजपला मिळाली ताकद

### » भाजपाच्या प्रकल्पांना गती देण्याचे आदेश

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्धा दिवस पिंपरी चिंचवड शहरात दौरा करत विविध विकासकामांचा आढावा घेतला. महापालिका आयुक्तांसोबत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक देखील घेतली. या बैठकीबाबत पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रवादीचे स्थानिक नेते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपाच्या नेत्यांमध्ये गैरसमज पसरविणाऱ्या चर्चा रंगविल्या. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरातील चालु असलेल्या विकास कामांना गती देण्याबाबतचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांमध्ये दुरावा निर्माण करण्याचा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचा प्रयत्न फसला असल्याचे चित्र आहे.**




देशाचे सक्षम नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, असे वारंवार उपमुख्यमंत्री अजित पवार सांगत आहेत. याच पंतप्रधानांनी मोशीतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे पुण्यातील जाहीर कार्यक्रमात कौतुक केले आहे.

महापालिकेत सत्तेत आलेल्या भाजपाने राबविलेल्या या प्रकल्पाचे कौतुक होणे ही भाजपाने केलेल्या कामाची पोचपावती आहे. तसेच शहरवासियांच्या नाव लौकिकात भर घालणारी म्हणावी लागेल. याबरोबरच कचऱ्याच्या समस्येवर उपाय काढण्यासाठी बायोमायनिंग प्रकल्पाची संकल्पना तत्कालीन सत्ताधारी भाजपाने राबवली.

यासह पिंपरी, चिंचवड मध्ये विविध प्रकल्प मार्गी लावण्याचे काम केले. मात्र भाजपाच्या प्रकल्पावर टीका करताना शहर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना पर्यायी उपाय योजना सुचविण्याचा विसर पडत आहे. केवळ राजकीय द्वेषापोटी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना चुकीची माहिती देऊन भाजपाच्या नेत्यांच्या बाबतीत गैरसमज पसरवण्याचे काम केल्याचे दिसले. उपमुख्यमंत्री पवार यांनी विविध प्रकल्पावरून अधिकाऱ्यांना दम दिल्याच्या चर्चा स्थानिक राष्ट्रवादीच्या नेत्यांनी रंगविल्या. मात्र अजित पवार यांनी सर्व प्रकल्पांचा आढावा घेऊन हे प्रकल्प त्वरित पूर्ण करा असे आदेश दिले. भाजपाच्या नेत्यांनी राबविलेल्या प्रकल्पाबाबत अजित पवारांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसले. उदा. पुनावळेतील नियोजित कचरा डेपो स्थलांतरित करावा, अशी मागणी भाजपा आमदार अश्विनी जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. याच मुद्द्यावरून अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत कचरा डेपोला पर्यायी जागा बघण्याची भूमिका मांडली. त्यामुळे चुकीच्या चर्चा रंगविणाऱ्या राष्ट्रवादीच्या स्थानिक

### भाजपा शहराध्यक्षांच्या भूमिकेशी सुसंगत भूमिका

**» भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मित्र पक्षांसह 125 प्लसचा नारा दिला आहे. त्यांच्या या भूमिकेशी सुसंगत भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील मांडल्याचे दिसले. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना भाजपाच्या पदाधिकाऱ्यांशी जुळवून घेण्याचे संकेत दिले आहेत. काँग्रेस सोबत ज्या पद्धतीने आघाडी करून काम करत होतो. तशाच पद्धतीने भाजपा सोबत काम करण्याची सूचना अजित पवार यांनी दिली आहे. त्यामुळे भाजपा आणि राष्ट्रवादी मिळून आगामी महापालिकेच्या निवडणुकीत 125 प्लसचा टप्पा नक्की गाठेल अशी स्थिती आहे.**

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा शहर राष्ट्रवादीला विसर

**»उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना आणि भाजपा युतीमध्ये सहभागी झाले आहेत. त्यामुळे युतीतील मित्र पक्षाबरोबर समजुतीने वागणे गरजेचे आहे. मात्र पिंपरी दौऱ्यात ते दिसले नाही. भाजपाला टार्गेट केल्याने शहर राष्ट्रवादी पदाधिकारी खुश झाले आहेत. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील सत्तेत प्रमुख नेते असून ते भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभे राहतील याची जाणीव राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना दिसली नाही.**

---

## पीएमपी बस चालकांचा संप!

### 200 चालकांचा संपात सहभाग

**।पिंपरी । महाईन्यूज ।**

पीएमपीएमएलच्या खासगी बस ठेकेदारांकडील चालकांनी शुक्रवारी (दि. 25) सकाळच्या सत्रात पीएमपी प्रशासनाने कोणतीही पूर्वकल्पना न देता संप पुकारला. दुसऱ्या दिवशीही त्यावर तोडगा निघाला नाही. या संपामध्ये पीएमपीच्या इलेक्ट्रिक बसवर कार्यरत असलेले ट्रॅव्हल टाइम कंपनीच्या तब्बल 200 बसचालकांचा समावेश आहे. पीएमपीची बससेवा अचानक बंद झाल्याने प्रवाशांचे हाल झाले. त्याचा दुसऱ्या दिवशीही परिणाम जाणवला.

महागाईच्या काळात किमान 750 ते 900 रुपयांपर्यंत रोज मिळायला हवा. मात्र, ठेकेदार फक्त 530 रुपयेच देतात. इतक्या कमी पगारात घर कसे चालवणार? त्यामुळे पीएमपी प्रशासनाने यात मध्यस्थी करून योग्य तो निर्णय घ्यावा, यासाठी कर्मचाऱ्यांनी हा संप पुकारला आहे. त्यामुळे प्रवासासाठी पीएमपी बसवर अवलंबून असणाऱ्या अनेकांना कार्यालयात, कामावर जाण्यासाठी उशीर झाला. पीएमपी बस गाड्या पुरवणाऱ्या ठेकेदारांच्या चालकांनी अचानक संपावर गेल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याचा फटका प्रवाशांना बसला. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि कर्मचारी हे रोज या पीएमपीने प्रवास करतात. अचानक बसची संख्या कमी झाल्यामुळे अनेकांना कामावर पोहचायला उशीर झाला.



### संप पुकारल्यामुळे बसच्या अनेक फेऱ्या रद्द

**» बस चालकांनी अचानक पुकारलेल्या या संपामुळे पीएमपी प्रशासनाने पर्यायी व्यवस्था म्हणून पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील सर्व अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, वाहक व चालकांच्या साप्ताहिक सुट्ट्या रद्द केल्या आहेत. तर, संप पुकारल्यामुळे बसच्या अनेक फेऱ्या रद्द झाल्या. चालकांचे नियोजन करून मार्गावर बस सोडल्या. पीएमपीकडे सध्या 2 हजार 181 बस आहेत. त्यातील काही ठेकेदारांच्या भाडेतत्वावरील तर काही स्व:मालकीच्या आहेत. सुमारे 4 हजार चालकांमार्फत शहरात बससेवा पुरविली जाते. पीएमपीचे स्वतःचे दोन हजार आणि ठेकेदाराचे दोन हजार चालक आहेत. ट्रॅव्हल टाइम कंपनीकडील 200 चालकांनी अचानक संप केला. त्यामुळे पीएमपीच्या वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला. परिणामी, बसेसची वारंवारिता कमी झाली.**

# बारामतीमध्ये दादांचे जल्लोशात स्वागत!

## जेसीबीच्या मदतीने त्यांच्यावर फुलांची उधळण

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तब्बल दोन महिन्यांनंतर पहिल्यांदाच आपल्या मतदारसंघामध्ये आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शनिवारी बारामतीकरांनी जल्लोशात स्वागत केले. शहराच्या वेशीवर असलेल्या छत्रपती शिवाजी उद्यानापासून फुलांची उधळण करीत अजित पवार यांची उघड्या जीपमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. अजित पवार यांच्यासमवेत पुत्र पार्थ हेही उघड्या जीपमध्ये मतदारांचे स्वागत स्वीकारत होते.**



### बारामतीकरांनी केली तुफान गर्दी...

राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर अजित पवार प्रथमच बारामतीत आलेले होते, त्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे बारामतीकरांनी केलेल्या भव्य स्वागताची राजकीय वर्तुळात चर्चा होती. नागरिकांनी उत्साहाने त्यांचे स्वागत करत त्यांना पाठिंबा दर्शविला. अजित पवार यांचा बारामती शहरात प्रवेश करताच कसब्यातील श्री छत्रपती शिवाजी उद्यानापासून लोकांनी तुफान गर्दी केली होती. अजित पवार हे लोकांचे अभिवादन स्वीकारत शारदा प्रांगणापर्यंत येईपर्यंत मोठा कालावधी गेला. या मिरवणुकी दरम्यान अजित पवार यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनीही लोकांच्या स्वागताचा स्वीकार केला.

'साहेबां'पेक्षाही 'दादां'च्या स्वागताला अधिक गर्दी झाली असल्याची चर्चा बारामतीकरांमध्ये रंगली होती. उपमुख्यमंत्रीपदाची थपथ घेतल्यानंतर अजित पवार यांचे बारामतीमध्ये पहिल्यांदाच आगमन झाले. बारामतीकरांनी अजित पवार यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. अजित पवार यांच्यासोबत त्यांचे पुत्र पार्थ पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते, बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर अजित पवार यांची ही पहिलीच बारामती भेट असल्याने कार्यकर्ते, नागरिक, व्यापारी, संस्था आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पहार, पुष्पगुच्छ देत स्वागत केले. जेसीबी यंत्राच्या मदतीने अनेक ठिकाणी त्यांच्यावर फुलांची उधळण केली गेली. क्रेनद्वारेही त्यांना पुष्पहार घातले गेले. अजित पवार यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर बँड, ढोलपथकाच्या निनादात त्यांची मिरवणूक काढण्यात आली. संतोष गालिंदे आणि सहकाऱ्यांनी अजित पवार यांच्यावर दोन टनांहून अधिक फुलांची उधळण केली. मिरवणुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी स्वागतकमानी लावून व्यापारी वर्गाने अजित पवार यांचे स्वागत केले. तालुक्याच्या विविध भागांतून तरुण दुचाकी रॅली काढून बारामतीच्या शारदा प्रांगणात दाखल झाले होते. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजी होळकर, शहराध्यक्ष जय पाटील, युवकाध्यक्ष अविनाश बांदल यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनी या सत्कार सोहळ्याचे नियोजन केले होते.

# समाविष्ट गावांचा विकास लांबणीवर!

## आराखडा प्रसिद्ध करण्यास पुन्हा मुदतवाढ

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकास आराखडा प्रसिद्ध करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने केला आहे. मुदतवाढीचा तसा ठराव मंजुरीसाठी महापालिकेच्या शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला असून, १ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढीचा हा प्रस्ताव आहे.**




### विकास आराखड्याचे काम ठप्प

मात्र, सन २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुकीमुळे विकास आराखडा प्रसिद्ध करण्यास विलंब झाला. त्यानंतर २०२० पासून करोना संसर्ग सुरू झाल्याने प्रारूप विकास आराखड्याचे काम ठप्प झाले. करोना संसर्ग नियंत्रणात आल्यानंतर आरक्षण निश्चिती, जमीन वापराचे नकाशे आणि त्याचा अहवाल करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

शहर सुधारणा समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे समाविष्ट गावातील विकास पुन्हा लांबणीवर पडणार आहे. महापालिका हद्दीत ४ ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा समावेश करण्यात आला. लोहगाव आणि मुंढव्यातील उर्वरित भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रूक, फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट झाली. त्यानंतर जवळपास एक वर्षाने म्हणजे ४ डिसेंबर २०१८ रोजी या गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा महापालिकेने प्रसिद्ध केला होता. त्याला २१ डिसेंबर २०१८ रोजी महापालिकेच्या मुख्य सभेने मान्यता दिली. मात्र, सन २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुकीमुळे विकास आराखडा प्रसिद्ध करण्यास विलंब झाला. त्यानंतर २०२० पासून करोना संसर्ग सुरू झाल्याने प्रारूप विकास आराखड्याचे काम ठप्प झाले. करोना संसर्ग नियंत्रणात आल्यानंतर आरक्षण निश्चिती, जमीन वापराचे नकाशे आणि त्याचा अहवाल करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. विकास आराखडा जाहीर करण्याची मुदत संपुष्टात आल्याने महापालिकेने मुदतवाढ द्यावी, असा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविला. राज्य शासनाने ज्या प्रस्तावाला २५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली. या कालावधीतही तो पूर्ण होऊ न शकल्याने आता पुन्हा १ मार्च २०२४ पर्यंतची मुदतवाढ राज्य शासनाकडे मागण्यात आली आहे. तसा प्रस्ताव शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला आहे. या गावांमध्ये अद्यापही प्रादेशिक आराखडाच लागू आहे. राज्यात सर्वत्र एकात्मकि बांधकाम नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी होत असताना या गावांमध्ये त्याची अंमलबजावणी होत नसल्याने विकासाला त्याचा फटका बसत आहे. हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) वापरून बांधकाम करण्यासही मर्यादा येत आहेत. आता पुन्हा मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आल्याने ११ गावांतील विकासही लांबणीवर पडणार आहे.

# 50 कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई महसूल गुप्तचर यंत्रणेच्या (डीआरआय) पथकाने पुणे ग्रामीण परिसरातून सुमारे 50 कोटी रुपयांचे 101 किलो मेथाक्युलोन हा अंमली पदार्थ जप्त केले. पुणे परिसरातून इतक्या मोठ्या प्रमाणावर डीआरआय पथकाने प्रथमच अमली पदार्थ जप्त केले आहे.

याबाबत डीआरआयच्या पथकाकडून तेलंगणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि हरियाणा येथील रहिवासी असलेल्या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. अमली पदार्थ विरोधी कायद्यातील एनडीपीएस कायदा 1985 च्या तरतुदीनुसार सदरची कारवाई करण्यात आली आहे. मुंबई डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पुण्यातून एक संशयित वाहन जप्त करण्यात आले होते. संबधित वाहनात पांढरे स्फटिकाचे साहित्य असलेले 4 निळ्या रंगाचे प्लास्टिकचे ड्रम मिळून आले. यामध्ये मेथाक्युलोन हा अमली पदार्थ मिळून आला आहे. अटक करण्यात आलेले आरोपी बेकायदा विक्री, खरेदी, वाहतूक आणि निर्यातीत गुंतलेले असल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. मेथाक्युलोन अमली पदार्थ विक्रीचे जाळे देशभरातील अनेक राज्यांमध्ये पसरलेले असल्याची शक्यता असून, त्याअनुषंगाने डीआरआय पुढील तपास करत आहे.पार्ट टाईमच्या नावाखाली चंदननगर भागातील 10 जणांची 25 लाख 65हजार 204 रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी वैशाली विनोद कुमार गुप्ता (वय ३६, रा. खराडी) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जानेवारी महिन्यात त्यांना व्हाट्सपवर पार्ट टाइम जॉब साठी मेसेज आला होता. युट्युब चॅनेलला लाईक, सबस्क्राईब केल्या नंतर पैसे मिळतील असे सांगितले. तसेच या पार्ट टाईम जॉब साठी तुम्ही तयार असाल तर टेलिग्रामची लिंक पाठवण्यात येईल असे सांगण्यात आले.

# नागरिकांच्या तक्रारींचे संवादातून निरसन!

## शंका, प्रश्नांचा निपटारा होण्यासाठी कर संकलनचा उपक्रम

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**करदात्यांच्या शंकाचे निरासन करण्यासाठी करसंकलन विभागाने करसंवाद उपक्रम सुरू केला. नागरिकांच्या मालमत्ताकर याबाबतच्या शंका, प्रश्नांचा निपटारा होण्यासाठी शनिवारी (दि.26) पार पडलेल्या करसंवादास नागरिकांनी ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला. करसंवादामध्ये 50 पेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला.**



करसंकलन विभागाने करदात्यांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सुरू केलेल्या "तू करदाता, तू करविता" अभियानाबाबतचा उद्देश व स्वरूप, मालमत्ताकराच्या ऑनलाइन सवलती, मालमत्ता हस्तांतरण, विभागाचे नवे धोरण आदींबाबतच्या शंकांचे निरसन व माहिती सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्या मार्फत देण्यात आली. यावेळी विभागाचे अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नागरिक व अधिकारी यांच्यामध्ये थेटसंवाद असावा या उद्देश असलेल्या कर संवादामध्ये नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती देण्यात आली. मालमत्ताकरावरील ऑनलाइन चार टक्के असणारी सवलत, मालमत्ता हस्तांतरण प्रक्रियेमध्ये विभागाने आलेली सुलभता, विलंब शुल्काबाबत शंकाचे निरसन, माझी मिळकत माझी आकारणीमुळे मालमत्ता आकारणी मध्ये झालेली स्पष्टता आदींबाबतच्या प्रश्नांचे निरसन कर संवादाच्या माध्यमातून करण्यात आले.

### करदात्यांबाबत कृतज्ञता

» पिंपरी-चिंचवड महापालिका नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी नागरिकांना उत्तम सेवा प्रदान करते. महापालिका नागरिकांना सेवा देताना करसंकलन विभाग विविध कारणांसाठी कराची आकारणी करून नागरिकांकडून करसंकलन करतो. जागरूक करदात्यांनी भरलेल्या कराचा पैसा समाजोपयोगी कामामध्ये वापरला जातो. तसेच गरजू घटकांना त्याचा फायदा होत असल्याने पालिका व करसंकलन विभाग नेहमीच करदात्यांबाबत कृतज्ञता बाळगून असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख म्हणाले.

---

# भक्ती शक्ती उद्यान चौकाजवळील जागेसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना साकडे

## विविध संघटनांनी अजित पवार यांच्याकडे मागणी

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**भक्ती शक्ती उद्यान चौकाजवळ निगडी गावठाणाला लागून असलेली एक एकर जागा शिवजयंती व अन्य उपक्रमांसाठी देण्याचा पीएमआरडीए प्रशासनाने घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा. त्याऐवजी भक्ती-शक्ती उद्यान चौकाजवळील पेठ क्रमांक २४ मधील जागा सार्वजनिक कार्यक्रमांसाठी राखीव ठेवण्यात यावी, अशा मागणीचे साकडे भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समितीसह विविध संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शुक्रवारी (दि.२५) घातले.**



माजी नगरसेवक मारुती भापकर यांच्यासह अण्णासाहेब कसबे, भाऊसाहेब आढागळे, युवराज कोकाटे, नकुल भोईर, प्रदीप पवार, धनाजी यळकर, शिवाजी साळवे, सतीश काळे, ब्रह्मानंद जाधव आदींनी उपमुख्यमंत्री पवार यांची भेट घेतली. भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समिती, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच सामाजिक संघटना आणि संस्थांच्या प्रतिनिधींनी निगडीतील भूखंडाबाबतची मागणी उपमुख्यमंत्र्यांसमोर ठेवली.

पीएमआरडीएचे महानगर आयुक्त महिवाल यांनी लोकप्रतिनिधी व विविध संस्थांच्या मागणीचा विचार करून, पेठ क्र.२१ येथील निगडी गावठाणाला लागून असलेली पीएमआरडीएच्या ताब्यातील खुली जागा क्र.९ निगडी, सर्व्हे नं.८३ मधील एक एकर (४० आर.) एवढे क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १८ ऑगस्ट २०२३ रोजी हस्तांतरीत केली आहे.

पीएमआरडीएने दिलेली जागा ही निगडीतील भक्ती-शक्ती शिल्पसमूह तातडीने रद्द करावा. तसेच, आमच्या मागणीप्रमाणे भक्ती-शक्ती शिल्पालगतचा पेठ क्रमांक २४ मधील संपूर्ण भूखंड सार्वजनिक उपक्रमासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घ्यावा.

जर आपण तसा निर्णय घेतला नाही तर आम्हाला पुन्हा एकदा आंदोलनाला सुरुवात करावी लागेल, असे उपमुख्यमंत्री पवार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# ३६ जिल्ह्यांचा प्रवास करत देणार "सायकल चालवा, पर्यावरण वाचविण्याचा संदेश"

## 66 वर्षीय तरुण 'महाराष्ट्र दर्शन सायकल मोहिमेवर'..!

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**"सायकल चालवा, पर्यावरण वाचवा" असा संदेश देत महाराष्ट्र दर्शन मोहिमेवर भोसरीतील मोशी, स्पाईन रोड येथील ६६ वर्षीय तरुण निघाला आहे. सायकल मित्र प्रकाश का. पाटील (पाटील काका) असं त्यांचं नाव आहे. या महाराष्ट्र दर्शन सायकल अभियान मोहिमेत ते राज्यातील ३६ जिल्ह्यांचा प्रवास करणार आहेत. उद्या रविवार दि.२७ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ७ वाजता भोसरीतील पीएमटी चौक येथील श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या मोहिमेला सुरुवात करणार आहेत.**






या मोहिमेकरिता त्यांना कामगार नेते, सायकल मित्र सचिनभैया लांडगे, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र पुणे, महेश दादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांनी विशेष सहकार्य केले आहे. या ३६ जिल्ह्यांच्या मोहिमेचा प्रवास उद्या दि.२७ रोजी सकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. ही मोहीम सुमारे ६ हजार किलो मीटरची असणार आहे. साधारणता तीन महिन्यांचा कालावधी या प्रवासाला लागणार आहे. दररोज १२५ किलोमीटरचा प्रवास ते करणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यात जाऊन तेथील मुठभर माती ते गोळा करणार आहेत. हा प्रवास पूर्ण झाल्यानंतर दिघी येथील डोंगरावर ३६ जिल्ह्यातून आणलेल्या मुठभर मातीसह ३६ झाडे ते लावणार आहेत. झाडे लावा पर्यावरण वाचवा असा संदेश ते या मोहिमेच्या माध्यमातून देणार आहेत.

सायकल मित्र प्रकाश का. पाटील हे गेले अनेक वर्षे सायकलिंग करत आहेत. आज पर्यंत पुणे ते नेपाळ, पुणे ते कन्याकुमारी, पुणे ते रामेश्वर, पुणे ते गोवा, पुणे ते खान्देश, पुणे ते तिरूपती बालाजी, पुणे ते हम्पी, तीन वर्ष प्रत्येक महिन्याला पंढरपूर वारी, अष्टविनायक दर्शन, पुणे ते स्टॅच्यू ऑफ युनिटी गुजरात तसेच भारतातील सोळा राज्यांचा सायकल प्रवास त्यांनी आजपर्यंत पूर्ण केला आहे.

# महापुरुषांच्या 'त्या' बदनामीवर गप्प का?




**शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यास विलंब का झाला, याविषयी प्रशासकीय चौकशी करण्याचे आदेश पनवेल सत्र न्यायालयाने नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांना नुकतेच दिले.**

या पार्श्वभूमीवर समाज माध्यमांवरून महापुरुषांविषयी उघडपणे केल्या जाणाऱ्या वादग्रस्त आक्षेपार्ह व बदनामीकारक लेखनाचा विचार होणे गरजेचे आहे. अशा लेखनामुळे वादंग निर्माण होऊ लागले आहेत. जातीय आणि धार्मिक द्वेषाच्या ठिणगीने सामाजिक वातावरण प्रदूषित होत आहे. महापुरुषांच्या बाबतीत चुकीचे बोलले, लिहिले जात आहे. एवढेच नव्हे तर देशाचा अपमान करणारी वक्तव्येसुद्धा पुढे येऊ लागली आहेत. मानवतेचे हक्क नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे समर्थन केले जात आहे. संविधानाचा अपमान केला जात आहे. यावर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे असताना, प्रत्यक्षात सरकार मात्र गप्प आहे, हे समर्थन समजावे का? महापुरुषांची बदनामी करणारी विकृत व्यक्ती छोटी असो किंवा लोकांच्या हृदयात विराजमान असो दोन्ही व्यक्तींना शासन तर व्हायलाच हवे ना? महापुरुषांच्या बाबत चुकीची वक्तव्य त्यांची महापुरुषांची बदनामी करणारे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत



भाषणे देत सुटले आहेत. अशा भाषणांना विरोध होत आहे, मात्र समर्थन करणारे सुद्धा रस्त्यावर येऊन आंदोलन करू लागले आहेत. अशा व्यक्तींच्या समर्थनार्थ आंदोलन केली जाणे, ही खेदाची बाब आहे. समाज सुधारकांनी महाराष्ट्रात केलेले परिवर्तन अशा लोकांना मान्य नाही का? म्हणून डोळे झाकून महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांवर अंध विश्वास ठेवला जात आहे. समाजमाध्यमांवरील पोस्टमुळे भावना दुखावल्या गेल्याने एखाद्याला चोप देणे, आंदोलने करणे अशा प्रकारे जनभावना अगदी ज्वालामुखीसारख्या बाहेर पडताना दिसतात. हा आक्रमकपणा गरजेचाच, परंतु तो महाराष्ट्रात ज्यांच्याकडून वारंवार महापुरुषांची बदनामी करणारी वक्तव्ये केली जातात, अशा व्यक्तींच्या विरोधातसुद्धा दिसला पाहिजे. अशा लोकांवर सुद्धा कारवाई व्हावी. अशा वेळी आक्रमकपणा का दिसून येत नाही? उलट अशा व्यक्तींना संरक्षण दिले जाते. हा महापुरुषांच्या बाबतीतील दुटप्पीपणा नव्हे का? बदनामीकारक वक्तव्ये कोणी केली, का केली, हे समस्त महाराष्ट्र जाणून आहे. आदरणीय समजल्या गेलेल्या व्यक्तीला केंद्रबिंदू मानून त्या व्यक्तीच्या इशाऱ्यांवर चालणाऱ्या अशा समर्थकांना महापुरुषांशी काहीच देणे घेणे नसते. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे आपले आदर्श आहेत, परंतु यांची बदनामी कोणी केली, कोण करत आले आहे, कशासाठी केली जात आहे हे जाणून न घेणारे मेंदू जातीय आणि धार्मिक दंगलीत गहाण पडलेले आहेत. त्यामुळेच खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणारी विकृती समाजातील काही घटकांत आहे. नक्की खरे आणि खोटे काय याविषयी सामान्यांचा गोंधळ उडावा म्हणून प्रयत्न केले जात आहेत. महापुरुषांनी जातव्यवस्था, धर्मातील चुकीच्या रूढी परंपरांवर आघात केल्याने धर्म धर्म करणारेही महापुरुषांना बदनामच करणार ना? महापुरुष समजून घ्यायचेही नाहीत व द्यायचेही नाहीत. अलीकडे अनेकजण स्वतःला इतिहाससंशोधक समजू लागले आहेत. हे सगळं का आणि कोणासाठी चालले आहे? स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ म्हणून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याकडे पाहिले जाते. इथल्या वर्ण व्यवस्थेच्या विरोधात जाऊन कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीक मागून नव्हे तर शिक्षण देऊन शैक्षणिक चळवळ गतिमान केली. परंतु आजही त्यांच्याबाबत मुद्दाम बदनामीकारक वक्तव्ये केली जातात. समाज सुधारकांनी स्वतःचे जीव धोक्यात घालून काम केले. समता, बंधुता नाकारणाऱ्या समाजात धर्माचे वर्चस्व असलेल्या लोकांना मानवतेची व्याख्या समजावून सांगणे सोपे नव्हते. त्यासाठी संघर्षच करावा लागणार होता. महापुरुषांचा, समाजसुधारकांचा हा संघर्ष लढवय्याप्रमाणे होता. त्या काळात ते लढले म्हणून तर आजचा आपला काळ सुकर झाला आहे. त्यांच्या कार्याशी आजच्या काळातील कोणत्याही व्यक्तीशी तुलना होऊ शकत नाही.

## संपादकीय »

### आनंद ते प्रज्ञानंद..

***बुद्धिबळपटूंना सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचाच नोकरी वा तत्सम स्वरूपात आधार असतो, ते बदलून यासाठी खासगी क्षेत्राने मोठ्या प्रमाणात पुढे यायला हवे.***

चंद्रयान-३ मोहिमेचा परमबिंदू आणि बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताचा आर. प्रज्ञानंद आणि माजी जगज्जेता मॅग्नस कार्लसन यांच्यातील अंतिम लढतीची संभाव्य परिणती असा योग बुधवारी सायंकाळी साधारण एकाच वेळेत जुळून आला होता. चंद्रयान-३ आणि प्रज्ञानंद हे आपापल्या मोहिमेत एकाच दिवशी, एकाच वेळी यशस्वी व्हावेत, अशी अपेक्षा साक्षात विश्वनाथन आनंदने बोलून दाखवली होती. त्याच्या बरोबरीने कोट्यवधी भारतीयांच्या मनातील पहिली अपेक्षा सुफळ पूर्ण झाली, दुसरी मात्र अधुरी राहिली. हे चालायचेच. चंद्रयान-२च्या अपयशाच्या कमानीखालून निघून, त्यापासून बहुमोल धडे घेऊन चंद्रयान-३ मोहीम भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'ने यशस्वी करून दाखवली. विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम टप्प्यापर्यंत येऊन कार्लसनकडून झालेला पराभवही प्रज्ञानंदसाठी भविष्यात अधिक चांगल्या कामगिरीसाठी उपयोगी ठरू शकेल.

**'लिव्ह इन प्रेझेंट'.. वर्तमानात जगा, असा एक सल्ला हल्ली वरचेवर कोणी ना कोणी कोणाला तरी देताना आढळतो. म्हणजे गेल्या क्षणाचा विचार करू नका आणि येणाऱ्या क्षणाची चिंता करू नका.. असं हे तत्त्वज्ञान. नवनव्या काळात नवनवे 'मॅनेजमेंट गुरू' म्हणवणारे, इंग्रजीत बोलणारे भोंदू उगवत असतात. त्यातल्याच कोणाची तरी ही मांडणी असावी.**

## वर्तमानातले वेडेपीर!

खरं तर फक्त वर्तमानाचा विचार करा.. हा सल्ला /सिद्धान्त म्हणून किती भयानक आहे! विचार केला तर जाणवेल की, या अशा फक्त आताचं काय ते पाहा.. या विचारांतूनच तर जल्पक नावाचे ट्रोल तयार होतात. मागचं काही पाहायचं नाही आणि पुढचं काही पाहण्याची कुवत नाही.. याइतकी आदर्श स्थिती जल्पक निर्मितीसाठी दुसरी कोणती नाही. आपल्याकडे या जल्पकांची पैदास इतकी वारेमाप का होऊ लागली आहे या प्रश्नाचा शोध घ्यायला गेलं तर हे त्याच्या मुळाशी 'फक्त वर्तमानात जगा' हा सल्ला असेल. असो. हे मॅनेजमेंट गुरू हा काही आपला विषय नाही. तर दोन दिवसांपूर्वी, २३ ऑगस्टला, आपल्या अवकाशयानानं चंद्राच्या दक्षिण गोलार्धावर पाऊल ठेवलं आणि हा जल्पकांचा हैदोस सुरू झाला. जल्पक होण्यासाठी काडीचीही अक्कल लागत नाही आणि अवकाशशास्त्र वगैरे गहन विषय समजून घेण्यासाठी अकलेखेरीज दुसरं काही लागत नाही. त्यामुळे विज्ञानविश्व आपल्या बुद्धिगम्य क्षेत्रात रममाण असतं आणि दुसरीकडे जल्पक बुद्धिशून्य उद्योगात आनंद साजरा करत



असतात. अशातल्याच एका मुरलेल्या जल्पकाचा त्या रात्री व्हॉट्सॲपवरला संदेश होता : "चंद्रयानानं परत येताना दोन दगड आणावेत.. एक येडा पुरावा मागणार". हा संदेश आणि त्याखाली स्वतःच्याच विनोदावर अजागळपणे खो खो हसतानाच्या दोन स्माईली. आता हे कोणाला उद्देशून असणार वगैरे मुद्द्याचा विचार करण्याचं कारण नाही. ते ज्याला उद्देशून आहे त्याचे समर्थक जल्पक हे पाहून घेतील. 'वर्तमानात जगा' हा सल्ला गंभीरपणे घेतला की उच्चदर्जाचे बिनडोक जल्पक कसे तयार होतात, याचा हा नमुना. कसं ते पाहूया..

पहिला मुद्दा म्हणजे चंद्रयान परत येणार नाहीये. म्हणजे हे यान चंद्रावर उतरलं, दगडमाती गोळा केलेली भरली आणि निघालं पुन्हा 'इस्रो'च्या बेंगळूरु मुख्यालयाकडे.. आणि मग एकमेव लाडक्या नेत्याच्या हस्ते यशस्वी चंद्रयानाची पाद्यपूजा वगैरे असं काही होणार नाहीये. ती क्षमता आपल्याला अद्याप मिळवायची आहे. आता जे काही आपल्याला जमतं त्यात चंद्रावर यान उतरवणं इतकंच अपेक्षित आहे. तिथं उतरलेलं यान पुन्हा सदेह पृथ्वीवर आणण्याचं ज्ञान आणि कौशल्य आपल्याला विकसित करायचं आहे. पुढची 'गगनयान' मोहीम त्यासाठी आहे. आता ती भविष्यात असल्यामुळे जल्पकानं याचा काही विचार केलेला नसणार. आणि दुसरं म्हणजे "एक येडा पुरावा मागणार" हे विधान. इतिहास माहीत असण्याची शक्यता नसल्यामुळे जल्पकानं याचाही विचार केलेला नसणार. तो केलेला असता तर मोहीम फत्ते झाल्याचा पुरावा मागणाऱ्यासाठी या जल्पकांनी 'एक येडा' असा शब्दप्रयोग केला नसता. कारण असा पुरावा मागणाऱ्याचं नाव आहे एपीजे अब्दुल

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महसूल मंत्र्यांना न्यायालयाने झापलं!

## » रेती परवानाधारकांना डिपॉझिट परत करण्याचे आदेश

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'न्यायालयीन प्रकरणांत राज्य सरकार हे खरे, तर एक आदर्श पक्षकार असते आणि सरकारने न्यायाचा आदर्श घालून देणे अभिप्रेत असते परंतु या प्रकरणात सरकारनेच पूर्णपणे भेदभावपूर्ण वर्तणूक करून अन्यायाचे प्रतीक असल्याचे दाखविणारी कृती केली आहे', अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने रेती घाट परवानाधारकांच्या प्रकरणात तीव्र संताप व्यक्त केला आहे.**

त्याचबरोबर 'दोन परवानाधारकांना त्यांची अनामत रक्कम १३ सप्टेंबरपर्यंत दिली नाही तर राज्य सरकारला प्रत्येकी पाच लाख रुपयांचा दंड लागू असेल. ती रक्कम परवानाधारकांना भरपाई म्हणून असेल', असे न्या. सुनील शुक्रे व न्या. मनीष पितळे यांच्या खंडपीठाने आदेशात म्हटले आहे. 'याचिकाकर्ते फुलचंद खाडे व अजय पवार यांना त्यांची अनामत रक्कम १३ सप्टेंबरपर्यंत दिली नाही तर त्या रकमेवर २८ नोव्हेंबर २०१७ रोजीपासून प्रत्यक्षात रक्कम दिल्याच्या तारखेपर्यंत वार्षिक सात टक्के व्याज सरकारला द्यावे लागेल. दंडाची रक्कम सरकारने हवे तर आपल्या विशेषाधिकारात महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करावी', असेही खंडपीठाने आदेशात म्हटले आहे. वास्तविक खाडे, पवार व संतोष मिंडे या तीन परवानाधारकांची अनामत रक्कम परत देण्याचा आदेश तत्कालीन महसूलमंत्र्यांनी ९ सप्टेंबर २०१४ रोजीच प्रशासनाला दिला होता आणि तरीही रक्कम मिळाली नसल्याने त्या तिघांनी याचिका केल्यानंतर उच्च न्यायालयाने



देखील २८ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रशासनाला आदेश दिला. एवढे होऊनही नंतरच्या महसूलमंत्र्यांनी आधीच्या महसूलमंत्र्यांचा आदेश २ जुलै २०१९च्या आदेशाने मागे घेतला. यावर कढी म्हणजे अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांनी तिघांपैकी केवळ संतोष मिंडे यांना त्यांची अनामत रक्कम परत दिली.

परंतु, खाडे व पवार यांच्या बाबतीत मात्र मंत्र्यांच्या आदेशाचे कारण देत त्यांच्या प्रकरणांत फेरविचार याचिका दाखल केल्या. अधिकाऱ्यांचा हा अत्यंत विचित्र, मनमानी व भेदभावपूर्ण कारभार पाहून खंडपीठाने तीव्र संताप व्यक्त केला. 'एकाच विषयात एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय, अशी राज्य सरकारची अत्यंत भेदभावपूर्ण वर्तणूक अजिबात खपवून घेतली जाऊ शकत नाही. सरकारने खरे तर आपली चूक लक्षात घेऊन खाडे व पवार यांच्या बाबतीत फेरविचार याचिका करायलाच नको होत्या.

त्यामुळे त्या मागे घेण्याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, असे आम्ही १९ ऑगस्ट २०२३च्या आदेशात म्हटलेही होते. त्यानंतरही सरकारने विचार करण्याबाबत आठ आठवड्यांच्या मुदतीची विनंती केली. सर्वसाधारणत: अशी विनंती आम्ही मान्य केली असती. परंतु, या प्रकरणात ती मान्य केल्यास आमच्याकडून याचिकाकर्त्यांवर अन्याय होईल', असे खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले आणि सरकारच्या दोन्ही फेरविचार याचिका फेटाळून लावल्या. 'अपरिहार्य व आपल्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांनी पूर्ण क्षमतेने रेती उत्खनन करता आले नाही आणि परवान्याचा कालावधीही संपला, या कारणामुळे या परवानाधारकांनी अनामत रक्कम परत मागितली होती. रक्कम परत देण्याच्या तत्कालीन मंत्र्यांच्या २०१४मधील आदेशाची अंमलबजावणी करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने २०१७मध्ये दिला होता. तो आदेश अंतिम झाला होता. तरीही २०१९मध्ये नंतरच्या मंत्र्यांनी आधीच्या मंत्र्यांचा आदेश मागे घेण्याचे काहीच कारण नव्हते. तसा त्यांना अधिकारही नव्हता. त्यामुळे महसूलमंत्र्यांचा २ जुलै २०१९चा आदेश चुकीचा आहे', असे निरीक्षणही खंडपीठाने आदेशात नोंदवले. या प्रकरणात खरे तर आम्ही सरकारला थेट दंड लावणार होतो. परंतु, सरकारी वकिलांनी विनंती केल्याने आता ती सशर्त लावत आहोत, असेही खंडपीठाने म्हटले.

### खंडपीठाने तीव्र संताप व्यक्त केला

» एवढे होऊनही नंतरच्या महसूलमंत्र्यांनी आधीच्या महसूलमंत्र्यांचा आदेश २ जुलै २०१९च्या आदेशाने मागे घेतला. यावर कढी म्हणजे अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांनी तिघांपैकी केवळ संतोष मिंडे यांना त्यांची अनामत रक्कम परत दिली. परंतु, खाडे व पवार यांच्या बाबतीत मात्र मंत्र्यांच्या आदेशाचे कारण देत त्यांच्या प्रकरणांत फेरविचार याचिका दाखल केल्या. अधिकाऱ्यांचा हा अत्यंत विचित्र, मनमानी व भेदभावपूर्ण कारभार पाहून खंडपीठाने तीव्र संताप व्यक्त केला.

# शरद पवारांनी कार्यकर्त्यांना संभ्रमात टाकू नये!

## » शरद पवारांनी एकदाचा निर्णय घ्यावा : गिरीश महाजन

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना संभ्रमात टाकू नये, त्यांच्या नेत्यांनी एकत्र येऊन एकदाचा निर्णय घ्यावा. सकाळी काय बोलतात, दुपारी काय बोलतात, भाषणात वेगळच बोलतात, दुसरीकडे म्हणतात, त्यांचा-आमचा प्रश्न मिटला आहे, त्यामुळे लोक, कार्यकर्ते संभ्रमात असून कॉंग्रेस-शिवसेना राष्ट्रवादीमुळे तर परेशानच झाली आहे.**

त्यामुळे दोघांमध्ये एकवाक्यता ठेवावी, स्वतःमध्ये एकवाक्यता ठेवावी, असा सल्लाही गिरीश महाजन यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना दिला आहे. आज ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकच्या लासलगाव बाजार समितीत जाऊन शेतकरी व्यापाऱ्यांची भेट घेत चर्चा केली. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलताना मंत्री गिरीश महाजन यांनी शरद पवारांना सल्ला दिला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते असल्याचे वक्तव्य करणारे शरद पवार यांनी दुपारी मात्र, घुमजाव केले. मी तसे बोललेलो नाही तर सुप्रिया सुळे तशा म्हणाल्या असल्याचे शरद पवार यांनी दुपारी सांगितले. सकाळी अजित पवार हे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते असलेले शरद पवार यांचे वक्तव्य राज्यभर चर्चेचा विषय झाला होता. मात्र, आपल्याच वक्तव्यावर दुपारी शरद पवारांनी घुमजाव केले. त्यामुळे कायम संभ्रम ठेवणाऱ्या



शरद पवारांच्या भुमिकेवरील संभ्रम आणखीनच वाढला आहे. माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी दोन्ही वक्तव्य केले आहेत. त्यामुळे हा संभ्रम आणखीनच वाढला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडली नाही. तसेच अजित पवार हे आमचे नेते असल्याचे म्हणालो नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. पक्षातील काही लोकांनी दुसरी भूमिका घेतली, त्यांनी पक्ष सोडला तर त्याला पक्षात फूट पडली असे म्हणता येत नाही. असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. ज्याना जायचे होते, त्यांनी नवीन मार्ग स्वीकारला असेल, तर त्याला फूट पडली असे म्हणता येत नसल्याचेही ते म्हणाले.राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या विधानावरून राजकीय चर्चा सुरू झाली आहे. शरद पवार यांच्या विधानाचा सरळसरळ अर्थ असा लावला जाऊ शकतो की महाराष्ट्राला व देशाला अजित पवार रिर्टन्स पार्ट-2 पाहायला मिळू शकतो, असे महाराष्ट्र कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, 'कोणत्याही परिस्थितीत भाजपाबरोबर जाणार नाही,'इंडिया' आघाडी बरोबरच राहणार आहे', असे शरद पवार यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्याचा वेगळा अर्थ काढण्याची गरज वाटत नाही. परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार व त्यांच्याबरोबर सत्तेत सहभागी झालेले त्यांचे सहकारी शरद पवार यांच्या पाया पडतात याचा अर्थ असा आहे की भाजपाने जी राजकीय घाण केली आहे त्याचे उत्तर अजित पवार रिटर्न्सने मिळू

### शरद पवारांचे वक्तव्य काय?

» राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते असल्याचे वक्तव्य करणारे शरद पवार यांनी दुपारी मात्र, घुमजाव केले. मी तसे बोललेलो नाही तर सुप्रिया सुळे तशा म्हणाल्या असल्याचे शरद पवार यांनी दुपारी सांगितले. सकाळी अजित पवार हे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते असलेले शरद पवार यांचे वक्तव्य राज्यभर चर्चेचा विषय झाला होता. मात्र, आपल्याच वक्तव्यावर दुपारी शरद पवारांनी घुमजाव केले. त्यामुळे कायम संभ्रम ठेवणाऱ्या शरद पवारांच्या भुमिकेवरील संभ्रम आणखीनच वाढला आहे.माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी दोन्ही वक्तव्य केले आहेत. त्यामुळे हा संभ्रम आणखीनच वाढला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडली नाही. तसेच अजित पवार हे आमचे नेते असल्याचे म्हणालो नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. पक्षातील काही लोकांनी दुसरी भूमिका घेतली, त्यांनी पक्ष सोडला तर त्याला पक्षात फूट पडली असे म्हणता येत नाही. असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले.

# शिवशक्तीवरून राजकारण तापलं !

## भाजपाला नाव बदलण्याची सवय : राशिद अल्वी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**चांद्रयान ३ मोहिमेत सहभागी झालेल्या महिला शास्त्रज्ञांची भेट घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. यावेळी त्यांनी नारीशक्तीचा उल्लेख करत शास्त्रज्ञांनी केलेल्या असामान्य कामगिरीचा सन्मान केला. चांद्रयान ३ मोहिमेअंतर्गत २३ ऑगस्ट रोजी यानाचे चंद्रावर लँडिंग झाले. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिक्स परिषदेसाठी दक्षिण अफ्रिकेला गेले होते.**

हा उपक्रम दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून पाहिला. त्यामुळे भारतात येताच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इस्रोच्या वैज्ञानिकांची बंगळुरूत येऊन भेट घेतली. तसंच, त्यांना संबोधितही केलं. यावेळी त्यांनी इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांना मिठी मारली. तर, महिला वैज्ञानिकांचंही विशेष कौतुक केलं.उपस्थित वैज्ञानिकांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ज्या मनाने आपण कर्तव्य कर्म करतो, विचार आणि विज्ञानाला गती देतो आणि जे सर्वांमध्ये उपस्थित आहे, ते मन शुभ आणि कल्याणकारी संकल्पाशी जोडलेले राहावे. मनाच्या या शुभ संकल्पांशी जोडले राहण्यासाठी शक्तीचा आशिर्वाद अनिवार्य आहे. ही शक्ती आपली नारी शक्ती आहे. निर्माणापासून प्रलयापर्यंत सृष्टीचा आधार नारी शक्तीच आहे. आपण सर्वांनी पाहिलं की चांद्रयान ३ मध्ये देशने आपल्या महिला वैज्ञानिकांनी देशाच्या नारी शक्तीने किती मोठी भूमिका पार पाडली आहे, असंही मोदी म्हणाले."स्पेस मिशनच्या टच डाऊन पॉईंटला एक नाव देण्याची वैज्ञानिक परंपरा आहे. चंद्राच्या ज्या भागावर आपलं चांद्रयान उतरलं आहे, भारताने त्या जागेच्या नामकरणाचा निर्णय घेतला आहे. ज्या जागेवर चांद्रयान ३ चं मून लँडर उतरलं आहे, त्या पॉईंटला शिवशक्तीच्या नावाने ओळखलं जाईल", अशी मोठी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली."आणखी एक नामकरण गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. चार वर्षांपूर्वी चांद्रयान २ चंद्रापर्यंत पोहोचलं होतं, तेव्हा प्रस्ताव होता की त्या जागेचं नाव ठरवलं जाईल, पण त्यावेळी आम्ही ठरवलं होतं की जेव्हा चांद्रयान ३ यशस्वीरित्या चंद्रावर पोहोचेल तेव्हा आम्ही दोन्ही पॉईंटचं नाव एकत्र ठेवू. आज मला वाटतं की जेव्हा हरघर तिरंगा, हर मन तिरंगा आणि चंद्रावरही तिरंगा आहे, तर तिरंगाशिवाय चांद्रयान २ शी संबंधित त्या जागेला दुसरं काय नाव देता येऊ शकतं? त्यामुळे चांद्रयान २ ने जिथे आपली पावलं ठेवली आहेत ती जागा आता तिरंगा या नावाने ओळखली जाणार आहे", असं मोदी म्हणाले."शिवमध्ये मानवतेच्या कल्याणाचा संकल्प आहे आणि शक्तीपासून त्या संकल्पांना पूर्ण करण्यासाठी सामर्थ्य मिळते. चंद्रावरील शिवशक्ती पॉइंट हिमालयापासून ते कन्याकुमारी जोडल्याचा बोध करत आहे", असं मोदी म्हणाले. "ज्या मनाने आपण कर्तव्य कर्म करतो, विचार आणि विज्ञानाला गती देतो आणि जे सर्वांमध्ये उपस्थित आहे, ते मन शुभ आणि कल्याणकारी संकल्पाशी जोडलेले राहावे. या शुभ संकल्पांशी जोडले राहण्यासाठी शक्तीचा आशिर्वाद अनिवार्य आहे. ही शक्ती आपली नारी शक्ती आहे भारताची युवा पिढी तंत्रज्ञान, विज्ञानाने भारलेली आहे. त्यामागे आपल्या अशाच स्पेस मिशनचं यश आहे. मंगलायानचे यश, चांद्रयान मोहिमेचे यश, गगनयानामुळे देशाच्या युवा पिढीला नवा उत्साह मिळाला आहे. प्रत्येकाच्या तोंडी आज चांद्रयानाचे नाव आहे. भारतातील प्रत्येक लहान मूल वैज्ञानिकांमध्ये आपलं भविष्य पाहत आहे. त्यामुळे तुम्ही फक्त चंद्रावर तिरंगा फडकवला नसून तुम्ही एक मोठं यश प्राप्त केलं आहे, ज्यामुळे भारताची संपूर्ण पिढी जागृत झाली आहे, त्यांना नवी ऊर्जा मिळाली आहे. तुम्ही पूर्ण पिढीवर आपल्या यशाचा ठसा उमटवला आहे", असं मोदी म्हणाले. "आज तुम्ही भारतीय मुलांमध्ये आकांक्षाचे बिज रोवले आहे, ते उद्या वटवृक्ष बनणार आहे असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### मोदी राजकारण करत आहेत

» या नामकरणानंतर पूर्ण जग आपल्यावर हसेल. चंद्राच्या त्या भागावर लँडिंग झाली, याचा आम्हाला गर्व आहे. पण, चंद्र आपल्या मालकीचा नाही. अथवा लँडिंग पॉईंटही आपल्या मालकीचा नाही. असे करणे भाजपाचा स्वभाव झाला आहे. सत्तेत आल्यापासून नाव बदलण्याची त्यांना सवय झाली आहे," अशी टीका राशिद अल्वी यांनी केली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यामुळेच 'इस्रो' आहे. १९६२ साली जवाहरलाल नेहरू आणि विक्रम साराभाई यांनी इस्रोची स्थापना केली होती. पंडित नेहरू 'इस्रो'चे संस्थापक होते. तो विषय पूर्णपणे वेगळा आहे. पण, पंतप्रधान मोदी राजकारण करत आहेत.

# कांद्यानंतर आता तांदळावर निर्बंध!

## राईसवर 20 टक्के निर्यात शुल्क, महागाई नियंत्रणासाठी पाऊल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने कांद्यानंतर आता उकडलेल्या तांदळाच्या निर्यातीवर 20 टक्के निर्यात शुल्क लावले आहे. पुरेसा स्थानिक साठा राखणे आणि देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. यापूर्वी सरकारने बासमती तांदूळ वगळता सर्व प्रकारच्या कच्च्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे.**

निर्यात शुल्क लागू केल्यामुळे भारताच्या तांदळाच्या निर्यातीत घट होणार असून, त्यामुळे अमेरिका, थायलंडसह परदेशातील तांदळाच्या किमती वाढणार आहेत. अर्थ मंत्रालयाने सांगितले की, केंद्र सरकारने उकडलेल्या तांदळावर 20 टक्के निर्यात शुल्क लावले आहे. हे आदेश 25 ऑगस्टपासून लागू करण्यात येत असून, ते 16 ऑक्टोबर 2023 पर्यंत लागू राहणार आहे. बंदरांमध्ये पडलेल्या उकडलेल्या तांदळावर ड्युटीतून सूट मिळेल.

म्हणजेच 25 ऑगस्ट 2023 पूर्वी ज्या तांदळाच्या दुकानांना LEO (लेट एक्सपोर्ट ऑर्डर) दिलेला नाही आणि वैध LC (लेटर ऑफ क्रेडिट) द्वारे समर्थित आहे, त्यांना निर्यात शुल्क आदेश लागू होणार नाही. या निर्बंधांमुळे भारताने आता बासमती तांदूळ वगळता सर्व तांदळाच्या जातींच्या निर्यातीवर बंदी घातली आहे.



देशातून निर्यात होणाऱ्या एकूण तांदळाच्या 25 टक्के वाटा गैर-बासमती पांढऱ्या तांदळाचा आहे. गेल्या महिन्यात, सरकारने बासमती तांदूळ वगळता सर्व प्रकारच्या पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली, देशांतर्गत पुरवठा राखण्यासाठी आणि आगामी सणाच्या हंगामात किरकोळ किमती नियंत्रित ठेवण्यासाठी. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या कालावधीत सुमारे 15.54 लाख टन बिगर बासमती पांढऱ्या तांदळाची निर्यात झाली आहे, जी मागील वर्षीच्या याच कालावधीत केवळ 11.55 लाख टन होती. अन्नधान्याच्या किंमतीत वाढ आणि निर्यात वाढल्याने बिगर बासमती पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. एक आठवड्यापूर्वी भारताने देशांतर्गत उपलब्धता वाढवण्यासाठी कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क लागू केले होते. तर 2023-24 या आर्थिक वर्षासाठी कांद्याचा बफर स्टॉकही वाढवण्यात आला आहे.

### कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क

» एक आठवड्यापूर्वी भारताने देशांतर्गत उपलब्धता वाढवण्यासाठी कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क लागू केले होते. तर 2023-24 या आर्थिक वर्षासाठी कांद्याचा बफर स्टॉकही वाढवण्यात आला आहे. त्याचबरोबर ऑक्टोबरपासून साखर निर्यातीवर बंदी घालण्याची तयारी सुरू आहे. कारण, ऊस उत्पादन आणि इथेनॉलच्या वापरात होणारी आगामी घट लक्षात घेऊन सरकार साखर निर्यातीवरही निर्यात शुल्क लावू शकते. केंद्र सरकारची ही कसरत खाद्यपदार्थांच्या किमतीत होणारी तीव्र वाढ रोखण्यासाठी आणि स्थानिक पुरवठा सुरळीत ठेवण्याचा एक भाग आहे.

# सुपरहिट 'सुभेदार'



सुभेदार सिनेमाची सर्वांना उत्सुकता होती. हा सिनेमा काल २५ ऑगस्टला संपूर्ण महाराष्ट्रात रिलीज झाला. नरवीर तान्हाजी मालुसरे यांच्या पराक्रमावर आधारीत हा सिनेमा गेल्या काही महिन्यांपासुन चर्चेत होता. अखेर सुभेदार रिलीज झालाय. सुभेदार सिनेमाला सुरुवातीपासुन प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. अनेक प्रेक्षकांना सिनेमा आवडतोय. सर्व काही चांगलं सुरु असताना सिनेमाचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर मात्र प्रेक्षकांवर नाराज झाले आहेत. दिग्पाल लांजेकर यांनी सुभेदार रिलीज झाल्यावर काही तासानंतर एक व्हिडीओ शेअर केला. या व्हिडीओ शेअर करुन दिग्पाल लांजेकर म्हणतात, काही प्रेक्षक सुभेदार सिनेमा पाहून सिनेमाच्या क्लायमॅक्सचा काही भाग मोबाईलवर शूट करुन अपलोड करत आहेत. मी तुमच्या भावनांचा आदर करतो. पण कृपया असं करु नक. ज्यामुळे सिनेमा पाहणाऱ्या इतर प्रेक्षकांचा रसभंग होईल. त्यामुळे सिनेमाचा क्लायमॅक्स किंवा इतर कोणताही भाग शूट करु नये, अशी विनंती दिग्पाल लांजेकर यांनी केलीय. 25 ऑगस्टला सर्वत्र हा सिनेमा रिलिज झाला. राज्यातील जवळपास 350हून अधिक चित्रपटगृहांत या सिनेमांचे 900 पेक्षा जास्त शोज दाखवण्यात आले. त्याचबरोबर भारतासह इतर सहा देशांत 'सुभेदार' प्रदर्शित झाला करण्यात आला आता या सिनेमाला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो हे चित्रपटाच्या कमाईच्या आकड्यावरुन कळेलच. या सिनेमाने पहिल्या पहिल्याच बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. सुरुवातीच्या आकडेवारीनुसार या सिनेमानं पहिल्या दिवशी 1.2 कोटींची कमाई केली आहे. एकीकडे बॉलिवूडमध्ये 'ड्रीम गर्ल 2', 'गदर 2' आणि हे चित्रपट प्रदर्शित झाले आहे आता त्याच्या तुलनेत 'सुभेदार' चित्रपटाच्या कलेक्शनचे समोर आलेले हे आकडे समाधान कारक आहेत.

# तुम्ही लोक माझी लाईफलाइन : क्रिती

बॉलिवूड अभिनेत्री क्रिती सेनन सध्या खुप चर्चेत आहे. तिला 'मिमी' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली आहे.या पुरस्काराची घोषणा होताच क्रितीने सोशल मीडियावर आनंद व्यक्त केला आहे. राष्ट्रीय पुरस्कार ज्युरी सदस्यांचे आभार मानत सिनेमाच्या टिमचेही आभार मानले होते. राष्ट्रीय पुरस्कार मिळवणं ही काही साधी गोष्ट नाही. क्रितीसाठी हा खूप मोठा क्षण होता. राष्ट्रीय पुरस्कार जिंकल्यानंतर आता क्रिती सेननने शनिवारी सकाळी मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात बाप्पाचे दर्शन घेतले. क्रिती तिच्या कुटुंबासह सिद्धिविनायक मंदिरात पोहोचली. यावेळी तिची बहीण, आई आणि वडिलांसोबत मंदिरात जाताना दिसली. एका व्हिडिओमध्ये क्रिती पिवळ्या रंगाचा सूटमध्ये दिसत आहे. देवाचा आशीर्वाद घेतल्यानंतर तिने पापाराझींना प्रसादही वाटला. तिचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत क्रितीने सांगितलं की, जेव्हा तिने पुरस्कार मिळवला तेव्हा ती एका मिटींगमध्ये होता. मीटिंगमध्ये तिचा फोन वाजत होता. ती मीटिंगमधुन बाहेर पडली त्यानंतर तिला ती पुरस्कार जिंकल्याचं कळालं. त्यावेळी ती खुपच भावुक झाली होती. तिने मीटिंग थांबवली आणि तिच्या कुटूंबाला भेटण्यासाठी गेली. ज्याचे स्वप्न तिने पाहिले होते



आणि ज्यासाठी तिने मेहनत घेतली ते सत्यात उतरल्यानंतर ती खुपच आनंदित झाली. तिने सोशल मीडियावर पोस्ट शेयर करत तिच्या कुटुंबाचे आभार मानले. त्याबरोबर तिने आलिया भट्टचेही अभिनंदन केले. क्रितीने लिहिले, 'आई, बाबा आणि नुपुर, तुम्ही लोक माझी लाईफलाइन आहात! नेहमी माझ्या चीअरलीडर्स असल्याबद्दल धन्यवाद..! आलियाचे अभिनंदन! मला तुमच्यासोबत हा मोठा क्षण शेअर करायला मिळाला!

# धर्मेंद्रला पाहून हेमा मालिनी खूश

पडद्यावर रोमँटिक सीन करायला हरकत नाही, असे हेमा मालिनी यांनी म्हटले आहे. स्क्रिप्टची मागणी असेल तर नक्कीच करेल, असे त्या म्हणाल्या. हेमा मालिनी यांना धर्मेंद्र आणि शबाना आझमी यांच्या रोमँटिक सीनबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता, तेव्हा त्यांनी असे उत्तर दिले. रॉकी आणि राणी की प्रेम कहाणी या चित्रपटात धर्मेंद्र आणि शबाना आझमी यांचा रोमँटिक सीन होता. हे दृश्य अगदीच अनपेक्षित होते. या वयातही धर्मेंद्र आणि शबाना हा सीन इतक्या सुंदरपणे साकारतील याची कुणालाही कल्पना नव्हती. आता हेमा यांनीही अशा दृश्याच्या चित्रीकरणासाठी वय हा मापदंड नाही, असे म्हटले आहे. हेमा मालिनी यांना विचारण्यात आले की, धर्मेंद्र आणि शबाना आझमी यांच्यासारखे रोमँटिक सीन करणे त्यांना कम्फर्टेबल आहे का? उत्तरात हेमा म्हणाल्या- का नाही? नक्की होईल. जर ते दृश्य गरजेचे असेल तर चित्रपटाशी संबंध असेल तर मला असे सीन्स करायला काहीच हरकत नाही.हेमा मालिनी याही खासदार आहेत. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मथुरा लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. 2019 मध्ये त्या पुन्हा या जागेवरून विजयी होऊन संसदेत पोहोचल्या. काही दिवसांपूर्वी हेमा यांना धर्मेंद्रच्या सीनवर प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना हेमा म्हणाल्या होत्या- मी अजून हा चित्रपट पाहिलेला नाही, पण मला खात्री आहे की लोकांना हा चित्रपट खूप आवडला असेल. मी धरमजींसाठी खूप आनंदी आहे, कारण त्यांना नेहमीच कॅमेरासमोर राहणे आवडते.

# अदा शर्माचा निर्णय

'द केरळ स्टोरी'मधून घराघरात लोकप्रिय झालेली अभिनेत्री म्हणजे अदा शर्मा. अदा शर्माने द केरळ स्टोरी सिनेमातुन सुंदर काम करुन प्रेक्षकांच्या मनात स्वतःचं स्थान निर्माण केलं. अदा आता पुन्हा एकदा चर्चेत आलीय. मीडिया रिपोर्ट्सचा दावा आहे की, अभिनेत्रीने मुंबईत हक्काचं घर विकत घेतलंय. अदाने जे घर विकत घेतलंय तिथे आधी दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत राहत होता. अदाने जे नवीन घर घेतलंय त्याच घरात 2020 मध्ये सुशांतने याच घरात आत्महत्या केली होती. तेव्हापासून आतापर्यंत हे घर अनेकदा चर्चेत आले होते. द केरळ स्टोरीच्या यशानंतर अदा शर्माची कारकीर्द सुसाट सुरू आहे.



# विन डिझेलला आली दीपिकाची आठवण !

भारत हा असा देश आहे जो वारंवार प्रेमात पाडण्यास भाग पाडतो. भारतीयांच्या मनात आपल्या देशाबद्दल प्रेम आहेच. पण इथे आलेले परदेशी पाहुणे सुद्धा देशाच्या प्रेमात पडतात. फास्ट अँड फ्युरियस फेम हॉलिवूड स्टार विन डिझेल सुद्धा भारताच्या प्रेमात पडलाय. विन डीझेलने नुकतंच सोशल मिडीयावर एक फोटो शेअर केलाय. हा फोटो पाहून विनला भारताची आणि दीपीकाने केलेल्या पाहुणचाराची आठवण येतेय असं दिसतंय.विन डिझेलला शुक्रवारी त्याच्या इंस्टाग्रामवर एक थ्रोबॅक फोटो शेअर केलाय, ज्यामध्ये तो एका रंगीबेरंगी ऑटोरिक्षात दीपिका पदुकोणसोबत पोज देताना दिसतोय. विन २०१७ ला हॉलिवूड ॲक्शन चित्रपट XXX: रिटर्न ऑफ झेंडर केजच्या प्रमोशनसाठी भारतात आला होता तेव्हाचा हा फोटो आहे. विन डिझेलने शुक्रवारी इंस्टाग्रामवर फोटो पोस्ट करुन कॅप्शनसह दिलंय की, "खूप कृतज्ञ आणि आशिर्वादीत अशा भारतासारख्या अद्भुत देशात प्रवास केला... आणि त्यांच्या सुंदर संस्कृतींचा अनुभव घेतला... मी न्यूयॉर्कमधील एक भाग्यवान माणुस आहे त्याला . हाहाहा. खुप प्रेम, नेहमी. विनने शेअर केलेला हा आठवणीतला फोटो पाहून अनेक भारतीय चाहत्यांनी विनला पुन्हा भारताला भेट देण्यास सांगितले. याशिवाय नेटकऱ्यांनी भन्नाट कमेंट केल्या आहेत. एकाने कमेंट केली, "विन डिझेल हा ऑटो रिक्षा चालवत आहे, दीपिका अय्यो!! काळजी घ्या!! दुसऱ्याने कमेंट केली आहे की, "फास्ट अँड फ्युरीअस 11 ऑटोरिक्षा सह." तिसऱ्या कमेंट केली केली की, "फास्ट टुक टुक अँड फ्युरियस." दुसऱ्याने लिहिले, "फास्ट अँड फ्युरियस 11 सीन लीक झाला.

# नीरज सुवर्ण पदकासाठी सज्ज!

## आज अंतिम फेरीत पाकिस्तानच्या अर्शदला देणार आव्हान

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टोकियो ऑलिम्पिक चॅम्पियन पोस्टर बॉय नीरज चोप्राने शुक्रवारी पॅरिस ऑलिम्पिकचे केवळ एकाच थ्रोमध्ये तिकीट पक्के केले नाही तर जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतही प्रवेश केला. उशीरा व्हिसामुळे शेवटच्या क्षणी बुडापेस्टला पोहोचलेले नीरज, किशोर जेना आणि डीपी मनू यांनीही भालाफेकीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. जागतिक ॲथलेटिक्समध्ये एकाच स्पर्धेत तीन भारतीयांनी एकत्र अंतिम फेरी गाठण्याची ही पहिलीच वेळ आहे. नीरजने पहिल्या थ्रोमध्ये ८८.७७ मीटर भालाफेक केली.**

ही त्याची मोसमातील सर्वोत्तम कामगिरी आहे.

नीरजने अंतिम फेरीत प्रवेश मिळवलेल्या १२ थ्रोर्समध्ये अव्वल स्थान पटकावले. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी वैयक्तिक पात्रता मानक ८३मीटर होते, तर ८५.५०मीटर हे पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मानक होते. नीरजने एकाच थ्रोमध्ये दोन्ही लक्ष्य पार केले. टोकियो ऑलिम्पिकमध्येही नीरजने एकाच थ्रोच्या जोरावर अंतिम फेरी गाठली होती. तेथे त्याने ८६.६५ असा थ्रो केला होता. अंतिम फेरीत तो ८७.५८ मीटरसह विजेता ठरला. युजीन (यूएसए) येथे गेल्या वर्षी झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी नीरजने केवळ एक थ्रो केला. तेथे त्याने ८८.३९ मीटर भालाफेकत रौप्यपदक पटकावले. आता तो उद्या रविवार २७ ऑगस्टला अंतिम फेरीत खेळणार आहे आणि जागतिक चॅम्पियनशिपमध्ये आपले पहिले सुवर्ण जिंकण्याचा त्याचा प्रयत्न असेल. डीपी मनू आणि किशोर जेना यांनी अंतिम फेरी गाठणे हे भारताचे यश आहे. मनूने शेवटच्या थ्रोमध्ये ८१.३१ मीटर भालाफेक केली. अंतिम फेरीत पोहोचलेल्या १२ थ्रोर्समध्ये तो सहाव्या स्थानावर राहिला. तर किशोर जेनाने ८०.५५ मीटरची सर्वोत्तम थ्रो केला. नवव्या स्थानावर राहून त्याने अंतिम फेरी गाठली. जेनाला या चॅम्पियनशिपमध्ये खेळणे अशक्य वाटत होते. हंगेरियन दूतावासाने त्याचा व्हिसा जारी केला नव्हता. नीरज चोप्राने स्वत: व्हिसा जारी करण्याची विनंती केली, जेणेकरून तो पहिल्यांदाच वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये खेळू शकेल. यानंतर, क्रीडा मंत्रालय आणि स्पोर्ट्स अँथॉरिटी ऑफ इंडियाच्या प्रयत्नांनी, त्याला तात्काळ व्हिसा देण्यात आला आणि तो जागतिक चॅम्पियनशिप सुरू होण्यापूर्वी बुडापेस्टला पोहोचला. फायनलमध्ये पोहोचलेल्या १२ थ्रोर्सपैकी फक्त तिघांनी ८३ मीटरचे वैयक्तिक पात्रता मानक पार केले. नीरज चोप्रा व्यतिरिक्त यामध्ये पाकिस्तानचा अर्शद नदीम (८६.७९) आणि टोकियो ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता चेक प्रजासत्ताकचा जाकुब वडलेजे (८३.५० मी) यांचा समावेश आहे. उर्वरित नऊ थ्रोर्सनी ८३ मीटरपेक्षा कमी कामगिरीसह अंतिम फेरीत प्रवेश केला. पात्रता फेरीत तीन भालाफेकपटूंना परवानगी दिली आहे. गतविजेता ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स पात्रता फेरीतच पराभूत झाला.




### नीरज ब गटात अव्वल ठरला

जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणारा पाकिस्तानचा अर्शद नदीम बराच वेळ दुखापतग्रस्त होता. बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्समध्ये ९० मीटर भालाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकणारा अर्शद या मोसमात कोणत्याही मोठ्या स्पर्धेत सहभागी झाला नाही, पण येथे त्याने ७०.६३ मीटरच्या थ्रोने सुरुवात केली आणि ८६.७९ मीटरच्या जबरदस्त थ्रोने तो अंतिम फेरीतील स्पर्धेसाठी पात्र ठरला. नीरजनंतरची हा सर्वोत्तम थ्रो होता, तो ब गटात अव्वल ठरला. अंतिम फेरीत नीरज आणि अर्शद यांच्यात रंजक लढत अपेक्षित आहे.

# राहुलला राखीव ठेवायला हवे होते!

## संघ निवडीवर पाकिस्तानचा खेळाडू संतापला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**राहुलचे दुखापतीतून पुनरागमन आणि आशिया चषक २०२३ साठी भारतीय संघात थेट निवड झाल्याबद्दल अनेक आजी-माजी दिग्गज क्रिकेट पटूंनी प्रतिक्रिया आहेत. त्याच यादीत आता पाकिस्तानचा माजी फिरकीपटू दानिश कनेरियाने एक वक्तव्य केले आहे. त्याने थेट बीसीसीआयच्या निवडकर्त्यांवर निशाणा साधत संघ निवडीवर टीका केली. के. एल. राहुलच्या फिटनेसबद्दल शंका आहे, त्यामुळे निवडकर्त्यांनी त्याला संजू सॅमसनऐवजी राखीव ठेवायला हवे होते, असे कनेरियाने म्हटले आहे.**

कराची पाकिस्तानचा माजी फिरकीपटू दानिश कनेरिया म्हणाला, राहुलला आशिया कपमध्ये राखीव खेळाडू असायला हवे होते. भारताने पॉवर हिटर संजू सॅमसनचा राखीव फलंदाज म्हणून त्यांच्या संघात समावेश केला आहे. हे त्यांनी उलट करायला हवं होत. संजू मुख्य संघात आणि लोकेश राखीव खेळाडू. के.एल. राहुलने कसोटी क्रिकेटमध्ये कामगिरी केली नाही, त्यामुळे त्याचे स्थान गमवावे लागले. यानंतर तो आयपीएलमध्येही धावा करण्यात अपयशी ठरला. मग तो आयपीएलमध्ये जखमी झाला होता आणि बरा झाल्यानंतर त्याला पुन्हा एकदा संघात स्थान मिळाले, हे अजिबातच योग्य नाही.

भारताने जर के.एल. राहुलला आणखी एक संधी देण्याचे ठरवले असेल तर संजू सॅमसनलाही संघात असायला हवे होते. दानिश कनेरिया म्हणाला की, संजू सॅमसनला पुन्हा एकदा ड्रिंक्स घेऊन जावे लागेल. त्यानंतर पुन्हा एकदा अनेक जण म्हणतील की, त्याला अन्यायकारक वागणूक दिली जात आहे. मी याच्याशी असहमत आहे. त्याला पुरेशी संधी दिली गेली जी त्याने दोन्ही हातांनी घेतली नाही. जर संघात संधी दिली जाते तेव्हा तुम्हाला परफॉर्म करावे लागते नाहीतर दुसऱ्या खेळाडूला जागा मोकळी करून द्यावी लागते. मुख्य निवडक अजित आगरकर यांनी भारतीय संघाची घोषणा करताना राहुलला अजूनही काही समस्या असल्याचे सांगितले होते. मैदानावरील त्याच्या कामगिरीवर सर्वांचेच विशेष लक्ष असणार आहे त्यात 'मॅच सिम्युलेशन' सत्रांचा समावेश असेल. त्याचे पर्यवेक्षण फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठौर आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड करतील. के.एल. राहुलच्या तंदुरुस्तीवर संघ व्यवस्थापन लक्ष ठेवून आहे.




### राहुलचा आशिया चषक संघात समावेश

राहुल फिटनेस ड्रिलमध्येही सामील होता पण त्याला यो-यो टेस्ट करायला नाही सांगितली. राहुलचा भारताच्या आशिया चषक संघात समावेश करण्यात आला आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर म्हणाले की, यष्टीरक्षक फलंदाजाला किरकोळ दुखापत झाली आहे जी त्याच्या पूर्वीच्या दुखापतीशी संबंधित नव्हती.

# रोहित ठरणार सर्वाधिक धावा करणारा फलंदाज

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एकदिवसीय विश्वचषक २०२३ सुरू होण्यासाठी ५० दिवसांपेक्षा कमी दिवस शिल्लक राहिले आहेत. भारतात होणाऱ्या या स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून ती १९ नोव्हेंबरपर्यंत खेळवली जाणार आहे. याआधी टीम इंडियाचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने मोठी भविष्यवाणी केली आहे.

टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरेल, असे त्याने म्हटले आहे. २०१९ मध्येही रोहित शर्माने सर्वाधिक धावा केल्या होत्या. त्याने ९ सामन्यात ६४८ धावा केल्या होत्या. विश्वचषकात टीम इंडियाला ८ ऑक्टोबरला चेन्नईमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे. तत्पूर्वी, सेहवाग म्हणाला की, भारतातील फलंदाजीला अनुकूल असलेल्या परिस्थितीमुळे पुढील एकदिवसीय विश्वचषकादरम्यान सलामीवीरांना चमकण्याची संधी मिळेल. आयसीसीच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओमध्ये सेहवागला विचारण्यात आले होते की, २०२३ च्या विश्वचषकात सर्वाधिक धावा कोण करणार? वीरेंद्र सेहवागने रोहित शर्माची निवड केली आणि म्हणाला, भारताकडे चांगल्या खेळपट्टी आहेत, त्यामुळे मला वाटते की सलामीवीर फलंदाजांना चांगली संधी मिळेल. जर मला एकाची निवड करायची असेल, तर मी रोहित शर्माचे नाव घेईन. इतर नावे आहेत, पण मी भारतीय आहे आणि मी भारतीय निवडले पाहिजे. त्यामुळे रोहित शर्मा. सेहवागने भारतीय सलामीवीर आणि कर्णधार रोहित शर्माचे कौतुक केले. त्याने सांगितले की, विश्वचषक अनेकदा तो सर्वोत्तम फॉर्ममध्ये दिसला आहे. तो म्हणाला, जेव्हा विश्वचषक येतो, तेव्हा त्यांची ऊर्जा पातळी, कामगिरी उंचावते. त्यामुळे तो चांगली कामगिरी करेल, याची मला खात्री आहे. यावेळी तो कर्णधारही आहे.